# ISW Marathi Shala -

# Navratra and Diwali Celebrattion 2019

नवरात्र भोंडला आणि खिरापतीची खुमारी ।
दगड माती पाण्याने, किल्ला बनला भारी ।।

The students of ISW Marathi Shala (Boston – NEMM) celebrated two festivals together by performing Bhondala in traditional and modern way. The traditional Bhondala songs and some modern songs like 'Barbie Doll song' were the attractions of this Bhondala. The typical bhondala khirapat was contributed by all the enthusiastic parents and teachers of Shala.


Another attraction of this event was making a Fortress out of mud. The enthusiastic and creative parents Rajesh Kaka and Milind Kaka initiated this activity couple years back in our Shala and it's been one of the demanding activity by students and parents in Shala community.

It was great to see the energy, enthusiasm among all kids and parents.



During our shala time, we make sure that kids feel comfortable and learn many different Marathi Words while working for such kind of projects. Past couple weeks, we were talking about Diwali Fort related words - for eg. दिवाळी, किल्ला, शिवाजी महाराज, बुरुज, माती, दगड, हिरकणी, गवळण etc. We also talked about Hirakani and her story of climbing down from Raigad. Please keep discussing with your kids about 'what they talked, learned in Shala, what they shared in shala, etc.' The basic goal of shala is to give our kids a typical मराठी वातावरण', let them know about मराठी सण, संस्कार.

We also keep the goal of preparing our eligible students for BMM Marathi Shala Exams at the end of the year. Though these exams are absolutely optional (no pressure at all), we would like our students to take an advantage of this opportunity.




Please feel free to reach out to us if you have any new ideas, inputs, suggestions.

Our contact email – iswmarathishala@gmail.com

जुन्याला नाविन्याची झालर...

आज आमच्या BMM ISW - मराठी शाळेने “भोंडला आणि दिवाळी च्या निमित्ताने  किल्ला किलला” असा दुहेरी बेत ठरवला होता. बोस्टन जवळील श्रुसबरी ह्या छोट्याश्या गावामध्ये आम्ही लहानमुलांची मराठी शाळा दर रविवारी भरवतो. शाळेच्या अंतर्गत अनेकविध कार्यक्रम आणि उपक्रम करायचा आमचा अट्टहास असतो. मुलांना मातृभाषेची आवड आणि गोडी तीही परदेशात फक्त पुस्तक-वह्या आणि परीक्षा ह्यावरून नव्हे तर रोजच्या दैनंदिन बोली भाषेतून आणि सांस्कृतिक कार्यक्रमातून, त्यांना जास्त जवळशी करायचा आमचा प्रयत्न असतो. त्याच विचाराने गेली काही वर्ष आम्ही ऑक्टोबर च्या महिन्यात भोंडला आणि किल्ला हे दोन उपक्रम या आमच्या शाळेत राबवतो. (कार्यक्रम आम्ही आखातो). ह्या वर्षी या दोन्ही गोष्टी  एकाच दिवशी करून त्या बरोबर चविष्ट अल्पोपहाराची सुद्धा योजना केली होती.

मुलांचा उत्साह आणि त्यांची इतर मुलांबरोबर काही नवीन गोष्टी करून पाहण्याची जिद्द, अनेक पालकांना आश्चर्यचकित करून गेली. भोंडल्या साठी आया उत्सुक होत्या.  जुनी गाणी आठवून म्हणून बघून जुने दिवस पुन्हा आठवत होत्या.

बालपण पुन्हा जगायला कुणाला आवडत नाही ? परंतु तसे असताना एक विचार मनात आला, - इतक्या वर्षांपूर्वीची भोंडल्याची ही  गाणी लहानपणी नवरात्राचे  १० दिवस   दररोज एक एक मैत्रिणीकडे भोंडले करत म्हणायचो,  ती अजूनही तोंडपाठ आहेत आणि nostalgia म्हणून अजूनही  आपल्याला ती म्हणायला आवडतात.

परंतु आजच्या अमेरिकेत वाढणाऱ्या  या छोट्या मुलामुलींना, ही भोंडल्याची गाणी, त्यांच्या संदर्भानुसार  लिहिली असतील तर त्यांना अधिक गम्मत वाटेल आणि म्हणून आम्ही एक नवा प्रयत्न केला. जुन्याच गाण्यांच्या  चालीत पण नव्या शब्दात आम्ही ही  गाणी मुलांकडून म्हणवून घेत भोंडला सादर केला. शाळेच्या मुलांनीच नाही  तर सर्व पालकांनी सुद्धा यात उत्साहाने भाग घेत या उपक्रमाचा आणि कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला.

जुन्याला नव्याची झालर देऊन, त्यामधील संस्कृतीची  सरिता  वाहती ठेवून त्याला वर्तमानाचे सहज वळण दिले, आणि त्याचा परिणाम छान झाला. तर हे आमचे नवीन गाणे, "कारल्याचा वेल" ह्या जुन्या गाण्याच्या चालीवर अगदी चपखल म्हणता आले ...

बार्बी डॉल माझी भारी ग भारी ग
तिच्या घरी आज पार्टी ग पार्टी ग
सगळ्या बार्बी येणार ग येणार ग
अमेरिकन डॉल पण आहे ग आहे ग
नटून सार्या जमणार ग जमणार ग

बार्बीला नेसवली साडी ग साडी ग
नखाला लावले पोलिश ग पोलिश ग
गालाला लावली लाली ग लाली ग
आईने घातली वेणी ग वेणी ग



खाऊ काय करू प्रश्न ग प्रश्न ग
आई म्हणते पोहे ग उपमा ग
बाबा म्हणतो वडा ग भजी ग
मला आवडतो पिझ्झा ग पिझ्झा ग

पार्टी awesome  झाली ग झाली ग
आता बार्बी थकली ग थकली ग
तिच्या क्रिब मध्ये झोपली ग झोपली ग
पुढची पार्टी केव्हा ग केव्हा ग ?
नेक्स्ट वीकेंड शिवाय नाही ग नाही ग

भोंडला आणि खिरापत खाऊन तृप्त झालेली मुले आणि पालक नंतर बाहेर दिवाळीचा किल्ला करायला पळाली. आता दिवाळीत किल्ला का करतात? हा प्रश्न आहे, मला तरी नीटसे उत्तर मिळाले नाहीये ... लहानपणी करायचो, एक परंपरा म्हणून. पण मी सहज विचार केला आणि असे जाणवले कि आजच्या काळात ह्याचे खूप महत्त्व आहे. मुलांवर यांत्रिक उपकरणं (digital मीडिया ) चा इतका पगडा आहे की त्यांना अश्या काही उपक्रमां मधून अनेक छान गोष्टी नकळत शिकता येतात ...





१. थोडासा इतिहास, आपले किल्ले, गड, शिवाजी महाराजांबद्दल माहिती,
२.कार्यसंघ - teamwork, आपण एकत्रित पणे केलेले काम, मुलांना वेगळा आत्मविश्स्वास, मैत्री, सामूहिक कार्याची नक्कीच झलक देऊन जातो
३.अभियांत्रिकी अभ्यास - बळकट उंच रचना करणे, माती विटा चा वापर आणि न पडणारा, उंच उभा किल्ला करणे आणि चुका करून त्यावरून शिकणे ह्या सर्व गोष्टी
४. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मुले बाहेर, मोकळ्या हवेत काही तास घालवू शकली, कुठल्याही यंत्रांशिवाय!

ह्या सगळ्यामुळे ही परंपरा का पडली ह्या पेक्षा ती चांगली फायदेशीर आहे तेव्हा पुढे कशी चालू ठेवायची ह्याचा विचार आपण सर्वांनी नक्कीच केला पाहिजे. जे outdated कालबाह्य आहे त्याला नाविन्याची झालर देऊन ह्या परंपरा पुढे सुरु ठेवणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे आणि पण ते नक्की करूया.

आमच्या ह्या बाल कलाकारांचा किल्ला पाहायला तुम्ही उत्सुक असाल. त्याचे एक चित्र ... खऱ्या किल्ल्याबरोबर मुलांना आवडेल असा cake-chocolate चा किल्ला सुद्धा शाळेतील मावंश्यानी हौसेने मुलांना देऊन त्यांना जाता जाता खुष केले.

धन्यवाद,
मराठी शाळा शिक्षिका





link to the pictures [https://drive.google.com/file/d/12TBbdNZ6tiSrzD_N_DpXRrYOUGYMtEEw/view?usp=sharing](https://drive.google.com/file/d/12TBbdNZ6tiSrzD_N_DpXRrYOUGYMtEEw/view?usp=sharing)

link to the vidoe - [https://youtu.be/mmiFIOEThak](https://youtu.be/mmiFIOEThak)